Vol 6 Issue 5 June 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 5 | June - 2016

Indian Streams Research Journal

ISRJ

# मुस्लिम मराठी साहित्याच्या प्रेरणा

शफिक हुसेन शेख
उपशिक्षक-जि.प.प्राथ. शाळा, इंदिरा नगर, मंदुप, ता.द. सोलापूर, जि. सोलापूर.




## प्रस्तावना-

मुस्लिम मराठी साहित्य हा नवा प्रवाह संपूर्ण मराठी भाषिकांची वाङमयीन संस्कृती घडवू इच्छित आहे. त्यासाठी मराठी साहित्य मंडळाने या नव्या प्रवाहांना स्वतः पुढाकार घेऊन सामिल करून घ्यायला हवे. तरच एक सलग एकात्म व्यापक अशी मराठी वाङमयीन संस्कृती घडवण्यास चालना मिळेल आणि या मराठी साहित्यातील सर्वच नव्या साहित्यांना त्यांच्या प्रवाहांना गुणात्मकतेचे भान प्राप्त होईल, मराठी साहित्य हे व्यापक स्वरुपाचे साहित्य आहे या साहित्याची सुरुवात ९ व्या, १० व्या शतकापासून झालेली आहे या साहित्याला अनेक साहित्य प्रवाहांनी समृद्ध केलेले आहे या साहित्याच्या प्रवाहांनी वाचन व लेखन करणाऱ्या विशिष्ट वर्गाची मक्तेदारी संपुष्टात आणली. आज मराठी साहित्याने जात, धर्म, पंथाच्या सीमा ओलांडलेल्या आहेत. जात, धर्म, पंथाच्या सीमेपलीकडे जाऊन अनेक प्रज्ञा आणि प्रतिभांनी आपल्या भावना आणि संवेदनाचे कथॉर्सिस करण्याचे माध्यम आता साहित्याला मानले आहे म्हणूनच आज मराठी साहित्य संज्ञेला व्यापक अर्थ प्राप्त झालेला आहे. त्या साहित्यात प्रामुख्याने मार्क्सवादी साहित्य, आंबेडकरवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, अस्तित्ववादी साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, जैन मराठी साहित्य, वीरशैव मराठी साहित्य आणि मुस्लिम मराठी साहित्य या साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्यविश्वाला अधिक सर्जक आणि समृद्ध केल्याचे दिसून येते.

आपल्या भारत देशात उपेक्षितांचे, अल्पसंख्याकांचे फार मोठे जग आहे, त्याचे दुःख त्यांची व्यथा नीट समजावून घेऊन आपल्या साहित्यांद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्याचा प्रयत्न मुस्लिम मराठी साहित्यिक करताना दिसतात. त्यामुळे मुस्लिम हा शब्द केवळ सांप्रदायिक वा धार्मिक नाही, असलाच तर हा शब्द मूल्यात्मक आहे या शब्दात साहित्यमूल्य आहे आणि मुलभूत इस्लामचा जो समस्त मानव मुक्तीच्या संघर्षाचे नाव आहे ते ही मानवतावादी मूल्यच आहे.

भारतात आत्तापर्यंत दलित, आदिवासी, मुस्लिम हे समाजघटक मूक होते, भुमिगत होते, देवाधर्माच्या नावावर त्यांना हजारो वर्षापासून दडपण्यात आले होते या सबंध पार्श्वभूमीवर ते साहित्यप्रवाह निर्माण होणे हे स्वातंत्र्यप्राप्तीची फार मोठी उपलब्धी आहे. मुस्लिम मराठी साहित्य हे देखील या सर्व साहित्यापैकीच एक आहे.

## मुस्लिम मराठी साहित्याच्या व्याख्या -

मुस्लिम मराठी साहित्य परिभाषित करण्यापूर्वी मुसलमान म्हणजे कोण? त्यांचा मराठी आणि मराठी साहित्याशी काय संबंध? हे समजून घेणे अगत्याचे ठरते.

व्यक्ती + ईस्लाम = मुसलमान हे समीकरण जोपर्यंत पूर्णपणे समजून घेतले जात नाही तोपर्यंत त्या साहित्याला दिशा मिळत नाही. कारण धर्माचा, समाजाचा आणि त्या सामाजिक संस्कृतीचा प्रत्यक्ष संबंध असतोच. ज्या समाजाबद्दल, संस्कृतीबद्दल लिखाण करावयाचे

आहे त्या समाजाची मानसिकता ज्या मुलभूत पायांवर उभी असते ती समजून घेतल्याशिवाय केलेले लिखाण हे दिशाहीन तर ठरतेच पण बहुतांशी विकृत वळण घेत असते. अशा लिखाणाचे साहित्यिक अवमूल्यनही होते म्हणून आपण प्रथम मुस्लिम मराठी साहित्याची व्याख्या करणे आवश्यक आहे.

१) डॉ. यु.म.पठाण - 'मुस्लिमांच्या जीवनातील सुख-दुःख व समस्यांचे चित्रण, मुस्लिम मराठी साहित्यिकांनी उभे केले पाहिजे, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जैन साहित्य, मुस्लिम साहित्य हे साहित्यातील विविध प्रवाह आहेत.' (१)
२) प्रा.डॉ.फ.ह.बेन्नूर- 'मराठी मुसलमान लेखकांचे साहित्य आणि महत्त्वाचे म्हणजे 'मुसलमान' म्हणून व 'मराठी माणूस' म्हणून जगत असताना जे ताण तणाव निर्माण होतात ते व्यक्त करणारे आणि त्यामधील समताण शोधण्याचा प्रयत्न करणारे साहित्य होय.''(२)

'मुस्लिम मराठी साहित्य म्हणजे मराठीतून लेखन करणाऱ्या मुस्लिम लेखकांचे साहित्य होय. याचा अर्थ मुसलमानी धर्माचे म्हणजे इस्लामचे प्रतिपादन करणारे साहित्य असा होत नाही आणि मुस्लिम मराठी साहित्याचे स्वरुपही तसे नाही'(३)

वरील व्याख्यांवरून थोडक्यात असे म्हणता येईल की, कोणत्याही मराठी साहित्यिकाने मुसलमान मन आणि माणुस समोर ठेऊन त्याच्याभोवती फिरणाऱ्या अंतर्बाह्य प्रश्नांबद्दल निर्माण केलेली सकारात्मक साहित्यकृती होय.

### मुस्लिम मराठी साहित्याच्या प्रेरणा-

मुस्लिम मराठी साहित्य हे वेगळ्या कारणांसाठी आणि वेगळ्या हेतूसाठी आहे आणि तो हेतू म्हणजे वेगळी आयडेंटिटी, वेगळे अस्तित्व, वेगळे ओळख असणे होय. कोणत्याही देशात मग तो प्रगत असो की अप्रगत असो कोणताही नवीन समाज निर्माण करता येत नाही किंवा त्याची नवी ओळख निर्माण करता येत नाही मग एकच पर्याय उरतो माणूस म्हणून माणसाची ओळख तो ज्या समाजाचा, धर्माचा, संस्कृतीचा आहे ती ओळख पुसून टाकता येत नाही, पुसली जात नाही हीच ओळख त्या समाजाची आणि त्या समाजातील व्यक्तीची कायमस्वरुपी राहते माणूस समाज विरहीत, भाषाविरहीत किंवा संस्कृती विरहीत नाही बदल होतो, प्रगती होते ती मूल्यांची परंतु त्या समाजाची वा त्या व्यक्तीची ओळख कधी ही बदलत नाही. त्यामुळे मुस्लिम मराठी साहित्य तेच राहील जे परिभाषित केलेले आहे त्या साहित्याची परिभाषा बदलणार नाही. बदल अपेक्षित राहील तो त्या साहित्यातील स्वरुपाचा, भाषेच्या माध्यमांचा, सकारात्मक विचारांचा हे उद्दीष्ट साध्य करताना ते कोणासाठी करीत आहेत, कोणातर्फे करत आहेत याचा विसर पडता कामा नये. मुस्लिम मराठी साहित्य हे मुस्लिम समाजातील साहित्यिकांनी मराठी माध्यमांचा वापर करून निर्माण केलेले साहित्य होय. इथे 'स्व'च्या केंद्र स्थानी मुसलमानी व्यक्ती आहे. त्याची पाळेमुळे आणि त्याचा अस्तित्वाचा आधार त्याचा दीन म्हणजे त्याचा धर्म ईस्लाम आहे.

### १. म. पैगंबर व सत्यान्वेषी ईस्लामधर्म मुस्लिम मराठी साहित्याची मुळ प्रेरणा-

ईस्लाम धर्म म्हणूनच मुस्लिम मराठी साहित्याची पहिली प्रेरणा म्हणजे मुस्लिम मराठी साहित्याकांचा, स्वतःचा ईस्लाम धर्म आणि ईस्लामधर्माचा प्रेषित मुहंमद पैगंबर हे आहेत. आत्तापर्यंतच्या साहित्य चळवळींचा आणि साहित्यप्रवाहाचा आढावा जर घेतला तर गोष्ट लक्षात येते की प्रत्येक ठिकाणी विशिष्ट एक उर्जा केंद्र आहे. मुस्लिम मराठी साहित्यामागे प्राधान्याने मुहंमद पैगंबर आणि त्यांचा पैगाम ही प्रेरणा आढळते. पैगंबरांनी जगातील माणसांसाठी धर्म दिला. माणुस हा स्वार्थी आहे हे ओळखून त्यांच्यासाठी वचने निर्माण केली. सत्याच्या प्रसारासाठी वैयक्तिक सुखाचा त्याग केला. सर्व मानवप्राणी एकाच पालनकर्त्याची आहेत हा विचार मांडला. भारतात इस्लाम येणे ही मानवमुक्तीसाठी प्रेरक घटना ठरली. समता, प्रेम, शांती, अहिंसा, स्वातंत्र्य या मूल्यांनुसार मुस्लिमांचे वर्तन आणि त्यानुसार लेखन करणे हेच मूळ ईस्लामला अभिप्रेत आहे. माणूस सारा एक आणि त्यांचे प्रेम शांतिपूर्वक वर्तन यापेक्षा वेगळा विचार कोणत्याही प्रागतिक चळवळींसाठी असू शकत नाही. मुस्लिम साहित्यप्रवाह ही प्रागतिक चळवळ आहे. माणसांमाणसांतल्या दंगलीवरचा तो उपाय आहे त्यामुळे महंमद पैगंबर त्याचा सत्यान्वेषी ईस्लाम ही मुस्लिम साहित्याची मूळ प्रेरणा मानावी लागते.

इस्लाम आणि मुहंमद पैगंबराच्या मुक्तीदायी प्रेरणामध्ये ईस्लामने मानवजातीला विषमतेतून देखील मुक्ती आणि मानवी समतेचा संदेश दिलेला आहे. ज्या काळात जगाच्या पाठीवर मानव समाज वंशभेद, वर्णभेद, रंगभेद, लिंगभेद आणि व्यवसायभेद अशा अनेक प्रकारच्या विषमतेच्या गर्तेत रुतलेला होता, त्याकाळात ईस्लामने आणि मुहंमद पैगंबराने मानवी समतेचा संदेश दिलेला आहे.

मानवीय समाजात स्वातंत्र्य आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी इस्लाम धर्माने अत्यंत मौलिक आणि मजबूत नियम आणि आधार प्रदान केलेले आहेत त्याने केवळ नैतिक प्रेरणाच दिली नसून त्यासाठी पूर्णतः कायदेशीर संरक्षण देखील पुरवलेले आहे. अत्याचार मुक्त समाज निर्माण करण्याबरोबरच ईस्लामने सर्वाधिक अज्ञानमुक्त समाज निर्माण करण्यावर भर दिलेला आहे तसेच मानवी जीवन वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवर जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अत्युच्य निती मुल्यावर अधारलेले असावे हा इस्लामचा आणि मुहंमद पैगंबराचा आग्रहपूर्वक प्रयत्न आहे. अशाप्रकारे सामाजिक समता, व्यक्ती स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, पोथी निष्ठेला विरोध, स्त्री पुरुष समानता आणि सर्व जमात वाद्यांना विरोध ही इस्लामची तात्त्विक विचारसरणी आहे. या सर्व नीतीमूल्यांचे पालनकरून एक आदर्श समाज निर्माण व्हावा याचा ईस्लामने प्रयत्न केलेला आहे आणि या सर्व प्रयत्नांचा भाग म्हणून आपल्या देशात शंभर कोटीहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या भारतात मुस्लिम समाजाचा सर्वात मोठा अल्पसंख्याक समुह म्हणून उल्लेख होतो. २०११ च्या जनगणनेनुसार मुस्लिमांची लोकसंख्या १३.४% म्हणजे जवळपास १४ कोटींच्या आसपास आहे. भारतातील संस्कृती परंपराशी समन्वय साधून या समाजाने आपला धर्म आणि प्रेषित मुहंमद पैगंबराची तत्त्वप्रणाली आणि तात्त्विक विचारसरणींचा अंगिकार करून आपले वेगळेपण विविधांगाने जपलेले आहे धर्म, उपासना, रितीरिवाज, सण, प्रथा, परंपरा, पेहराव, भाषा आणि सामाजिक संकेत आदी पातळीवरील आपली वैशिष्ट्ये जपताना मुस्लिम मराठी साहित्यिकांच्या जीवनातील त्या दोन प्रेरणा ईस्लाम धर्म आणि प्रेषित मुंहमद पैगंबराच्या मौलिक संदेशावर जीवन व्यतीत करत असल्याने

हजरत मुहंमद पैगंबराच्या मानवमुक्तीचा लढा आणि ईस्लाम धर्माचे तत्त्वज्ञान ही मुस्लिम मराठी साहित्यिकांची प्रेरणा ठरलेली आहे. त्यामुळे मुस्लिम मराठी साहित्यिक आपली वैशिष्टचे अबाधित ठेऊन मराठी साहित्यिक म्हणून एकजिनसीपणा दाखवण्यात पुढाकार घेत आलेला आहे. जगण्याचा संघर्ष अटळपणे स्विकारून साहित्यिक त्याच्या आकलनानुसार ईस्लाम धर्माचा विचार आणि प्रेषित मुहंमद पैगंबरांच्या तत्त्वप्रणालीचा स्विकार करून आपली लेखन शैली समृद्ध करत आहे.

२. एकेश्वरवादी तत्त्वज्ञान व प्रस्थापित विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध बंड ही दुसरी प्रेरणा-

मध्ययुगीन काळामध्ये ४९ मुस्लिम मराठी संतांनी काव्यरचना केलेली आहे. त्यामुळे मराठी साहित्यातील त्यांचे स्थान आणि त्यांचे साहित्यिक योगदान नाकारता येत नाही. अर्वाचिन काळामध्येही मुस्लिम रचनाकार साहित्यनिर्मिती करत आहेत. पण प्रस्थापित रचनाकार त्यांच्या साहित्यरचनेकडे पूर्वग्रहदूषितपणे पाहत आहेत. मुस्लिमांची मातृभाषा ही उर्दू आहे. मुस्लिम मराठी साहित्यिकांची साहित्यिक चळवळ ही इ.स.१९९० पासून सुरू झालेली आहे. मुस्लिम मराठी साहित्याचा प्रवाह हा दलित ग्रामीण आदिवासी साहित्य प्रवाहांच्या जवळचा प्रवाह आहे. कारण मराठी साहित्यातील विविध प्रवाहांचे कमी अधिक प्रभाव मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहावर पडत आहेत. हिंदू बहुजन समाजाचे आणि भारतीय मुसलमानांचे प्रश्न जवळजवळ एकच आहेत. या विविध प्रश्नांनी मुस्लिम मराठी लेखकांच्या मनात जी घुसमट केली आहे ती घुसमट आणि या घुसमटीतून मुस्लिम मनाची जी कोंडी केली आहे तीच मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहाची दुसरी प्रमुख प्रेरणा आहे. मुस्लिम समाज हजारो वर्षांपासून या देशात राहतो आहे तो या देशाच्या सुख-दुःखाचा या देशाच्या संस्कृतीचा, इथल्या भाषिक जीवनाचा भाग झालेला आहे आणि या देशाच्या आंतरविश्वाशी रक्तसंबंधाचे नाते जोडूनही येथील धार्मिक, सामाजिक व्यवस्था अजूनही त्याला परकीय दृष्टीने पाहते ही, जी जाणीव आहे ती अत्यंत तरल जाणीव आहे. ''आजच्या भारतात असलेल्या मुस्लिमांपैकी ९० टक्क्यांवरून जास्तच मुस्लिम हे धर्मांतरित मुस्लीम आहेत. काहीजण प्रलोभनाने धर्मांतर करते झाले तर बहुसंख्य चातुर्वर्ण्याला कंटाळून समतेसाठी मुस्लिम झाले. इस्लाम धर्म बाहेरून आला परंतु ९० टक्के मुसलमान बाहेरून आलेले नाहीत.''(४)

महात्मा जोतीबा फुले यांच्या सामाजिक न्याय, समता शिक्षण, ज्ञान मिळण्याचा अधिकार आणि पददलित विशेषतः शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूकीतुन म्हणजेच बहुजन समाजाची आर्थिक पिळवणुकीतून मुक्तता ही चतुःसूत्री त्यांच्या सामाजिक क्रांतीचा गाभा होता. मुहंमद पैगंबरांनी चौदाशे वर्षापूर्वी अरबस्तानात घडवून आणलेल्या क्रांतीचे हेच चार आधारस्तंभ होते. हिंदू समाजातील उच्चवर्णीयांकडून शुद्रातिशुद्रांचे होणारे शोषण, त्यांना शिक्षणापासून कायमचे वंचित ठेवणारी व अमानुष वागणूक देणारी समाजव्यवस्था या पार्श्वभूमीवर पैगंबरांनी निर्माण केलेली वरील मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था व त्यासाठी त्यांनी निर्माण केलेले समतेचे आणि समाजकल्याणकारी तत्वज्ञान या गोष्टींनी महात्मा जोतिबा फुले प्रभावित होणे साहजिकच होते ''माणूस ही निर्मिकाची सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे व सृष्टीतील सुर्य, चंद्र, झाडे, सागर, नद्या किंबहुना सारी चराचर सृष्टी मानवासाठी निर्माण करण्यात आली आहे. इतकेच नाहीतर या साऱ्या विश्वावर मानव अधपित्य गाजविल असे या निर्मिकाने कुरआनात सांगितले आहे. कुरआनातील तत्वज्ञानाचे हे सार म्हणून सांगता येईल याच वैचारिक भूमिकेतून पैगंबरांनी आपल्या राजकीय व सामाजिक क्रांतीची उभारणी केली व हेच क्रांतीकार्य आणि त्यांना अधारभूत असलेली मूल्ये व तत्वज्ञान महात्मा जोतीबा फुल्यांनी आपल्या कार्यातून सिध्द करुन दाखवले.''(५)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनात प्रारंभीच्या काळापासून ईस्लाम आणि मुस्लिमांच्या संबंधित संदर्भ येत असत बहिष्कृत हितकारणी सभेचे मुखपत्र असलेल्या 'बहिष्कृत भारत' या आपल्या वृत्तपत्रात आंबेडकरांनी समाजसुधारक लोकहितवादी यांची इस्लाम वरील लेखमाला छापली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इस्लाममधील समतावादी तत्वांमुळे प्रभावित झाले होते व हिंदू धर्मांच्या संपर्कामुळे त्यात अनिष्ठ बाबींचा शिरकाव होवून भारतात इस्लामाची जी अवनती झाली त्याबद्दल आंबेडकरांना नेहमीच खंत वाटत होती भारतातील बहुजन समाजाची जी घुसमट होत आलेली आहे त्याप्रमाणेच मुस्लिम समाजाची घुसमट होत आहे हे बाबासाहेबांना दिसत होते त्यांनी अनेक ठिकाणी या अवनतीबद्दल भाष्य केलेले आहे आणि हिंदू धर्मालाच त्यासाठी जबाबदार ठरवले आहे. १९३५ साली येवला येथे मृत्यूपूर्वी हिंदू धर्माचा त्याग करुन नव्या धर्माचा स्विकार करेन अशी घोषणा केल्यानंतर त्यांच्या काही अनुयायांनी धर्मांतर करण्याचे ठरवून त्यांची भेट घेतली असता बाबासाहेबांनी त्यांना ईस्लाम स्विकार करण्याचा सल्ला दिला होता. ''धर्मांतर करण्याची इच्छा असल्यास इस्लामचा स्विकार करा असे अग्रही प्रतिपादन त्यांनी १५ मार्च १९२९च्या बहिष्कृत भारत मधून केले होते.''(६)

बाबासाहेबांना बहुजन समाजाला योग्य प्रतिनिधीत्व मिळावे, बहुजनांबरोबर मुस्लिमांनाही सत्तेचा वाटा मिळावा आणि त्यांच्या सामाजिक परिस्थितीचा उत्कर्ष व्हावा अशी त्यांची इच्छा होती हे यावरुन दिसून येते. दलितांच्या घुसमटीबरोबर ते इतर समाजाच्या अंतर्मन, त्यांची धुसमटी विषयी जाणून होते म्हणून त्यांना मुस्लिमांची सामाजिक परिस्थिती उंचावण्यासाठी अनेक प्रयत्न केले आणि ते प्रयत्न आज फलस्वरुप झाल्याचे आपणांस दिसते. त्याचबरोबर रामजन्मभूमी आणि बाबरी मशिदीचा वाद दिर्घकाळ चघळण्यात आल. बाबराशी इथल्या बहुजन मुसलमानांचा वांशिकदृष्टच्या, सामाजिक दृष्टचा, भाषिकदृष्टच्या कुठलाच संबंध नसताना ते बाबरकी औलाद, अफझूल्याची संताने ठरले हिंदू आणि मुसलमानांचे धर्मवादी, जमातवादी घटकांमुळे प्रचंड प्रमाणात दंगली होवून त्यामुळे समाजात प्रचंड उलथापालथ झाली त्यामुळे ह्या सामाजिक जाणीवा लेखकांच्या लेखनाच्या प्रेरणा बनत गेल्या. समान नगरी कायदा, तलाक यासारख्या प्रश्नांशिवाय ते राष्ट्रीय प्रवाहात येणार नाही हा प्रचार करण्यात आला. त्यामुळे मुस्लिम स्त्री सुधारणेचा प्रश्न, स्त्री सुधारणेला महत्त्व आणि त्याचा संबंध राष्ट्रीय प्रवाहाशी जोडल्यामुळे मुस्लिम समाजाचे असे विविध प्रश्न अधिकच गुंतागुंतीचे झाले त्यामुळे ह्या गुंतागुंतीच्या प्रश्नांवर मुस्लिम समाज मन व्यक्त होवू लागले परिणामी असे विविध प्रश्न हे मुस्लिम मराठी साहित्याचे प्रेरणा ठरत गेले.

३. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्यव्यवस्था मुस्लिम मराठी साहित्याची तिसरी प्रेरणा-

भारत देशातील घटनेत नमुद केलेली जी मूल्यव्यवस्था आहे स्वातंत्र्य, समता, बंधुता, त्याचबरोबर पोथी निष्ठेला विरोध आणि

जमातवाद्यांना विरोध ही तात्वीक विचारसरण आहे. डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानांमध्ये भारतीयांपुढे ठेवलेली ही मूल्ये क्रांतिकारकच होती १९५० पूर्वी धर्माच्या आणि त्याच्या पंथांच्या, जातीच्या आणि त्याच्या उपजातींच्या संहितांचा गोंधळ सुरु होता. या संहितांच्या गर्दीत देशाचे देशपण, एकसंधता आणि एकजुटता या गोष्टी हरपूनच गेल्या होत्या. आता संपूर्ण देशाला बाबासाहेबांनी एकाच अनुशासनात एकाच नैतिक सुत्रात बांधणारे आणि सर्वांना क्रांतिकारी ओळख देणारे संविधान दिलेले होते. संविधानातील समान नागरी कायद्याचे हे ध्येय हे भारताच्या निर्मितीच्या दृष्टीने क्रांतीवाचक विधानच होतं. सर्वच क्षेत्रातील प्रतिमांना आणि सर्वच लोकांना संविधानाने अखंड माणसाच्या आणि अखंड भारताच्या निर्मितीचा पूर्ण कार्यक्रम दिला होता. क्रांतीशी, परिवर्तनाशी संबंध सांगणाऱ्या एकेकट्या प्रतिमांचे आणि प्रश्नांचे पूर्वीचे अनाथपण आणि भय आता संपले होते कारण या प्रतिमांच्या पाठीशी आता खुद्द बाबासाहेबांनी दिलेले संविधानच विचारस्वतंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य घेवून उभे राहिले होते. समतेसंबंधी, ईहवादासंबंधी आणि समाजवादासंबंधी लिहणे ही आता गौरवाची गोष्ट ठरणार होती आणि संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आता देशातील इतर प्रज्ञा-प्रतिभांप्रमाणेच मुस्लिम प्रज्ञा-प्रतिभासाठीही आदरणीय ठरले होते हे युगांतर होते हा नव्या हिमतीचा काळ होता स्वप्नांमध्ये आता जन्म घेण्याचे साहस आले होते आणि मुक्तपणे फुलण्यासाठी लागतो तो बुलंद विश्वास त्यांच्यात निर्माण होवून शिकलेला मुस्लिम तरुण १९८० नंतर स्वतंत्रपणे, धाडसाने मराठीमध्ये आपल्या समाजाची सुख-दुखे सांगू आणि लिहू लागला. शेख महंमदाबरोबर अनेक मुस्लिम संतांनी मराठीमध्ये काव्य रचना करुन मराठीला समृध्द बनवले त्यामध्ये प्रामुख्याने शहामुनी, शहा नवरंग, जंगली फकीर सय्यद, नजीर पठाण, शहा हुसेन फकीर इत्यादी किती तरी नावे सांगता येतील या संताच्या काव्यरचनेतून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे त्यांनी दिलेली समतेची शिकवण होय. तसेच सर्वधर्म हे पवित्र आहे याची जाणीव या संतानी मध्ययुगीन काळात करुन देवून हिंदू आणि मुस्लिम समाज यांच्यात तो समन्वय घडवून आणण्यांचा महत्त्व प्रयत्न केला आहे आणि हीच सामाजिक समतेची प्रेरणा मुस्लिम मराठी साहित्यामागे आहे म्हणूनच संविधानातील मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मुस्लिम मराठी साहित्याच्या महत्त्वाच्या प्रेरणा आहेत, म्हणून प्रा.डॉ. गिरीष मोरे म्हणतात, ''मुस्लिम साहित्यप्रवाहाच्या बळकटीसाठी त्यांना काही मुल्यांची जपणूक आणि स्विकार करण्याची आवश्यकता आहे. सर्वात महत्वाचा स्विकार ईस्लाममधील वचनांचा आहे विषम समाजव्यवस्थेच्या काळात ईस्लामने समतेचा पुरस्कार केलेला आहे. म्हणूनच मुस्लिम मराठी साहित्यिकांनी आणि साहित्य प्रवाहाने समता हे मूळ इस्लाम मधील मूल्य स्विकारलेले आहे.''(७)

भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी दिलेली संसदीय लोकशाही सर्वधर्मातील लोकांना स्वातंत्र्य बहाल करते त्यामुळे प्रत्येकजण आपआपल्या धर्मानुसार जगण्यासाठी भयमुक्त झाला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय, राष्ट्रनिष्ठा, अहिंसा ही मुल्ये भारताला बुध्दाने दिली, पुढे महंमद पैगंबरानी दिली. जोतीबा फुल्यांनी सांगितली आणि तीच संविधानात बाबासाहेबांनी अंतर्भुत करुन सर्वांनाच न्याय दिला, म्हणून ही मूल्ये सर्वच साहित्याच्या प्रेरणा ठरत गेल्या.

### ४. म.जोतीबा फुले व डॉ. आंबेडकरांचे विचार मुस्लिम मराठी साहित्याची चौथी प्रेरणा-

मुस्लिम मराठी साहित्याची चौथी महत्वाची प्रेरणा ही महात्मा जोतीबा फुले यांची वैचारिक प्रेरणा आहे. सामाजिक न्याय, समता, शिक्षण, न्याय व ज्ञान मिळवण्याचा अधिकार आणि पददलितांची आर्थिक पिळवणुकीतून मुक्तता ही चतु:सूत्री जोतीबांच्या सामाजिक आणि वैचारिक क्रांतीची प्रेरणा होत्या.

सर्वाचा निर्मिक एक आहे धनी
त्याचे भय मनी ।। धरा सर्व ।।(८)

असा विचार जोतीबांनी मांडला बहुजन मुस्लिम भिन्न वाटत असले तरी तो शुद्रातिशुद्रां सारखेच सर्वंकष शोषणाचे बळी आहेत त्या सर्वांमध्ये वंशिक समानता आहे असे ते मानतात तसेच महात्मा फुले यांनी मुस्लिम राज्यकर्ते आणि धर्मांतरीत मुस्लिम समाज ह्यांच्यात फरक केलेला आहे. म. जोतीबांनी शिवाजी महाराजावरील पोवाड्यात आणि शेतकऱ्यांच्या आसुडमध्ये मुस्लिम राज्यकर्त्यांवर आणि त्यांच्या राजवटीवर कडाडून हल्ला चढविला आहे. जोतीबांचा हा विचार मुस्लिम मराठी साहित्यासाठी प्रेरणादायी ठरतो भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण प्रसारामुळे दलित सदृश्य ग्रामीण मुस्लिम समाजात हळूहळू मध्यमवर्ग निर्माण होत गेला आणि त्यानंतर महात्मा फुले यांची वैचारिक प्रेरणा घेवून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून मुस्लिम मराठी लेखकांनी प्रबोधनवादी विचार मांडला मराठी भाषेचा आग्रह धरला, मेळावा, परिषदा यांच्या परिणामातून सांप्रदायिकत्वाच्या पंज्याखाली दबलेला मराठी भाषिक मुस्लिम मध्यमवर्गीय माणूस महात्मा फुले यांच्या प्रेरणेने लेखनातून मोकळा झाला, बोलू आणि लिहू लागला आणि आपल्या व्यथा समाजासमोर मांडू लागला त्यामुळे ज्योतीराव फुल्यांची प्रेरणा मानणे मुस्लिम साहित्यप्रवाहाच्या बळकटीसाठी उपयुक्त आहे.

दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नायक मिळाले पण मुस्लिम समाजाला असे नायक न मिळाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विषमतेविरुध्दच्या लढ्याला आपली प्रेरणा मानून ग्रामीण बलुतेदारी समाजव्यूहाशी निगडीत असलेले मुस्लिम लेखक मंडळी मराठी साहित्यात चित्रित होण्यासाठी धडपडत आहेत. मुस्लिम मराठी साहित्य हे दलित साहित्यातून संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या फारच तोकडे आहे पण इथे हे दोन्ही समाज घटक अस्पर्शच म्हणून गणले गेले आहेत. जी तीव्रता दलितांना सहन करावी लागली तेवढीच मुस्लिम समाजाला सहन करावी लागली नाही तरी दोन्ही समाज घटकांना सामाजिक विषमतेची खोल जखम सहन करावी लागत आहे. दोन्ही समाजांना आज नव्याने नव्या युगाच्या संदर्भात नवे अत्याचार सहन करावे लागत आहेत त्यामुळे निर्माण होत असलेल्या मानसिक कोंडीतून आगळेवेगळे साहित्याची निर्मिती होत आहे.

मुस्लिम साहित्य प्रवाहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे महत्त्वाच्या प्रेरणापैकी एक आहेत त्याला मुस्लिम मराठी

साहित्याची अत्यंत महत्वाची प्रेरणा मानावी लागेल त्यांनी धर्म आणि विज्ञानाची महत्वाची सांगड घातलेली आहे. हुकुमशाही आणि हिंसेच्या मार्गाने कुठलाही प्रश्न सुटत नाही हा सिध्दांत त्यांनी मांडला हा सिध्दांत भारतातील हिंदू-मुस्लिम तणांवासाठी पर्याय ठरु शकतो बार्शी जि. सोलापूर येथे भरलेल्या मुंबई, प्रांतिक बहिष्कृत परिषदेत मे १९२४ मध्ये ते म्हणतात, ''माझी खात्री आहे की जर आपण आज धर्म त्याग केला आणि केलाच आहे तर त्याऐवजी माझ्या मते महंमदी धर्म स्विकारणे बरे.''(९) भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी दिलेली संसदीय लोकशाही सर्वधर्मातील लोकांना स्वातंत्र्य बहाल करते त्यामुळे प्रत्येकजण आपआपल्या धर्मानुसार जगण्यासाठी भयमुक्त झाला आहे. फ.म. शहाजिंदे यांनी असे म्हटले आहे की महंमद पैगंबर, सुफी संत, ज्योतीबा फुले आणि डॉ. आंबेडकर यांचा विचार हे मुस्लिम मराठी साहित्याचे उर्जाकेंद्र आहे या विचारांच्या बळावरच मुस्लिम मराठी साहित्य निर्माण होत आहे. मुस्लिम साहित्यप्रवाहा मागच्या प्रेरणाअधिक बळकट करता येतात शेवटी मानवहितासाठी परिवर्तनाचा विचार मांडणे आणि तो डोळसपणे वैज्ञानिक दृष्टीने स्विकारणे केव्हाही फलदायी ठरते. धर्माला हात लावायचा नाही, तेवढे सोडून बोला ही पारंपारिक दृष्टी साहित्यप्रवाहाला खंडित करु शकते आतापर्यंत विविध देशात ज्या राज्यक्रांत्या आल्या, त्या होण्यापूर्वी धर्मसुधारणा झालेल्या आहेत याचा इतिहास तपासून पाहात येतो फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी पोपविरुध्द झालेली चळवळ, मार्टिन ल्युथर किंग केलेली सामाजिक चळवळ अथवा बुध्दाने केलेली धर्मक्रांती पुढील काळात राज्यक्रांतीला उपकारक ठरली आहे. त्यामुळे मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहाच्या वर्धिष्णूतेसाठी महंमद पैगंबर, सुफी, संत, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या बळावर प्रेरणा घेवून साहित्यिक आपल्या लेखणीतून मुस्लिम जाणीवांचा प्रसार करत आहेत.

परिवर्तन हे कोणत्याही साहित्य प्रवाहामध्ये असलेले एक महत्वाचे मुल्य आहे जे आहे ते सुखावह नाही त्यासाठी त्यामध्ये बदल होण्याची गरज आहे म्हणून टोचणाऱ्या, आगतिक करणाऱ्या किंवा माणूस म्हणून जगण्यासाठी आड येणाऱ्या बाबींना नकार दिला पाहिजे. बाबासाहेब ईस्लामी समतेच्या तत्वाने प्रेरित झाले होते मुसलमान मुल्ला-मौलवींच्या अजानमुळे मशिदीत जातात आणि एकमेकांच्या सोबतीने नमाज पडतात. मुसलमानांमधील ही समता त्यांच्या एकजुटीसाठी महत्वाची आहे हिंदूपेक्षा अहिंदूमधली समता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उल्लेखलेली आहे, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट (१९३८) या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी हिंदुपेक्षा मुसलमानात समतेचे तत्व अधिक आहे. या विषयी त्यांनी विचार मांडला. ''शिख अथवा मुसलमान हा निर्भिडपणे कोणत्याही प्रसंगास तोंड देतो कारण आपण जरी एकटे असलो तरी एकलकोंडे नाही, समग्र समाज आपल्या पाठीशी आहे. या बळावर एक समाज खंबीरपणे संकटास तोंड देतो.''(१०) ही क्षमता मुळ इस्लामधली जिचा विसर अलीकडे पडत चालला आहे तो पुन्हा स्विकारला पाहिजे. म. जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या द्वयींना इस्लाम धर्म आणि त्यांचे अनुयायी यांच्याबद्दल सहानुभूती होती म्हणूनच त्यांना मुस्लिम मराठी साहित्यीक हा पूर्वीपासून आपल्या प्रेरणास्थानी मानत आलेला आहे.

## समारोप -

अशाप्रकारे मुस्लिम मराठी साहित्याच्या प्रेरणा ह्या संत साहित्यातील मानवमुक्तीशील, समताधिष्ठीत समाज निर्मितीच्या व एकेश्वर तत्वज्ञानाच्या आहेत. तसेच म. जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दैनंदिन जीवनातील संघर्ष व त्यातून मिळणारे अनुभवातून नवनिर्मिती करु पाहणाऱ्या शोषणमुक्त विषमतारहित समाजनिर्मितीच्या आहेत.

## संदर्भ आणि टिपा -

१) पठाण यु.म. - अ.भा.मुस्लिम मराठी साहित्य परिषद स्मरणिका - पृ.क्र.५
२) देशमुख नसीम एहतेशाम - मुस्लिम मराठी साहित्य स्वरुप व समीक्षा, सुजय प्रकाशन, धुळे, प्र.आ. २०१३ पृ.क्र.४.
३) बेन्नूर फक्रुद्दीन - मऱ्हाटवाणी अ.भा. मुस्लिम मराठी साहित्य परिषद पत्रिका पुणे. १९९५ पृ.क्र. १४
४) पानसरे गोविंद - मुस्लिमांचे लाड, महाराष्ट्राचे कौन्सिल भाकपा राजभवन, मुंबई, द्विआ १५ जुलै १९९३
५) मुकादम अब्दुल कादर - शोधाच्या नव्या वाटा म.फुले आणि इस्लाम (संपा. हरी नरके) प्रकाशक, प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, पृ.क्र.१३५
६) बहिष्कृत भारत - १५ मार्च १९२९ शासकिय मुद्रणालय, पृ.क्र.२४४
७) मोरे गिरीष - मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप (संपा शहाजिंदे फ.म. व तांबोळी फारुक) भूमी प्रकाशन, लातूर, २०१४. पृ.क्र.१५७
८) महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ - म.फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ, मुंबई, १९९१ पृ.क्र.५३५
९) कुरेशी जावेद पाशा - मुहाजिर, युगसंवाद प्रकाशन, नागपूर, प्रआ. २००१ पृ.क्र.६२.
१०) आंबेडकर बाबासाहेब - जातीसंस्थेचे उच्चाटन- (अनुवाद वसंत मुन नाग), नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०११ पृ.क्र.६५

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org